मध्य रेल्वेत डिजिटल क्रांती : 'सुगम रेल' व 'रेल-अर्थ' ॲप्सचे महाव्यवस्थापकांकडून उद्घाटन

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) : मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांनी अलीकडेच मालमत्ता व्यवस्थापनासाठी 'सुगम रेल' आणि 'रेल-अर्थ' या दोन डिजिटल अनुप्रयोगांचे (ॲप्सचे) उद्घाटन केले. हे अनुप्रयोग मध्य रेल्वेच्या आधुनिकीकरण उपक्रमाचा एक भाग असून, विद्युत विभागामार्फत प्रधान मुख्य विद्युत अभियंता श्री अनुप कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर्गत पातळीवर विकसित करण्यात आले आहेत. या ॲप्समुळे पारंपरिक कागदाधारित प्रक्रिया संपुष्टात येऊन केंद्रीकृत, डेटा-आधारित मालमत्ता व्यवस्थापन प्रणाली रेल्वेला प्राप्त होणार आहे, ज्यामुळे संपूर्ण रेल्वे नेटवर्कमध्ये कार्यक्षमता, सुरक्षा आणि विश्वासार्हता अधिक वाढेल. या कार्यक्रमास अतिरिक्त महाप्रबंधक श्री प्रतीक गोस्वामी, प्रधान विभागप्रमुख तसेच मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

'सुगम रेल' हा अनुप्रयोग लिफ्ट आणि एस्केलेटरसाठी तयार करण्यात आलेला असून ही सर्वसमावेशक मालमत्ता व्यवस्थापन प्रणाली आहे. यामध्ये एस्केलेटर व लिफ्टच्या देखभाल व बिघाड विश्लेषणाची डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही प्रणाली पूर्णपणे कागदविरहित असून देखभाल वेळापत्रकं आणि तपासणी अहवालांचे डिजिटायझेशन करते. यात प्रोॲक्टिव्ह मेंटेनन्सची सुविधा असून, वारंवार होणाऱ्या बिघाडांबाबत व देखभालीची नियोजित मुदत चुकल्यास त्वरित अलर्ट पाठवले जातात, ज्यामुळे वेळेत लक्ष दिले जाऊन उच्च दर्जाचे अनुपालन सुनिश्चित होते. तसेच परफॉर्मन्स इन्साईट्स अंतर्गत प्रत्येक मालमत्तेनुसार व बिघाडाच्या कारणानुसार सविस्तर विश्लेषण केले जाते. मीन टाइम बिटविन फेल्युअर्स (एमटीबीएफ) आणि मेंटेनन्स

कंप्लायन्स रेट यासारख्या मुख्य कार्यक्षमता निर्देशकांद्वारे (केपीआय) मालमत्तेची विश्वासार्हता तपासली जाते. या ॲपमध्ये सेंट्रलाईझ मॉनिटरिंगची सुविधाही असून रोल-आधारित प्रवेश नियंत्रण प्रणालीद्वारे डेपोपासून मुख्यालयापर्यंत प्रत्येक स्तरावर मालमत्तेची स्थिती (गंभीर, लक्ष देण्याची गरज, बिघाड) रिअल-टाइममध्ये निरीक्षण करता येते.

सुगम रेलमुळे प्रवाशांचा अनुभव अधिक सुखकर होतो कारण लिफ्ट व एस्केलेटरचे सुरळीत व सतत ऑपरेशन सुनिश्चित होते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, गर्भवती महिला व शारीरिकदृष्ट्या अपंग प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे. नियमित देखरेखेमुळे बिघाड होण्याची शक्यता कमी होते आणि वेळेवर दुरुस्ती करता येते. बिघाड झाल्यास जलद समस्यानिवारण करून डाउनटाइम कमी केला जातो. नियोजित दुरुस्तीमुळे अनपेक्षित बिघाडांचा धोका टाळता येतो. विश्वासार्ह कार्यक्षमतेमुळे सर्व प्रवाशांसाठी सुलभता आणि समावेशकतेला प्रोत्साहन मिळते. सर्वसाधारणपणे सुगम रेल या ॲपद्वारे रेल्वे प्रणाली अधिक कार्यक्षम, विश्वासार्ह आणि प्रवासी अनुकूल बनवली जाते.

'रेल-अर्थ' हा अनुप्रयोग रेल्वेच्या विद्युत अर्थिंग पिट्सच्या व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आला आहे. यामुळे पारंपरिक पद्धतीतून केंद्रीकृत, डेटा-आधारित ऑपरेशनमध्ये रूपांतर घडवून आणले गेले आहे. प्रत्येक पिटला एक अद्वितीय क्रमांक दिला जातो, ज्यामुळे कर्मचारी स्थानक, संबंधित मालमत्ता व तपासणी इतिहास यासह सर्व माहिती सहज मिळवू शकतात. या ॲपमधून अस्वस्थ पिट्स (प्रतिरोध 5), विलंबित तपासण्या आणि कधीही तपासल्या नसलेल्या पिट्ससाठी त्वरित सुरक्षा अलर्ट मिळतात. तसेच अहवाल प्रणाली सुलभ करण्यात आली असून कार्यक्षम नियोजन व अहवाल सादरीकरणास मदत होते. यामध्ये अनिवार्य पूर्व-मॉनसून अनुपालन अहवालाचाही समावेश आहे, ज्यामुळे वेळेवर सुरक्षा तपासण्या सुनिश्चित होतात. रेल-अर्थमुळे जबाबदारी वाढते आणि सुरक्षेसाठी अधिक प्रोॲक्टिव्ह दृष्टिकोन अवलंबला जातो. यामुळे विद्युत धक्क्याचा धोका टाळता येतो व जनतेला आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षित कार्यपरिसर मिळतो. योग्य अर्थिंग कनेक्शनमुळे विद्युत अपघाताचा धोका कमी होतो व लोकांना संभाव्य हानीपासून संरक्षण मिळते. तसेच विद्युत प्रणाली व उपकरणांचे नुकसान टाळून डाउनटाइम व देखभाल खर्च कमी होतो. रेल-अर्थमुळे विद्युत सुरक्षा निकष व नियमांचे पालन सुनिश्चित होते आणि संस्थेत सुरक्षा संस्कृतीला प्रोत्साहन मिळते. योग्य अर्थिंगमुळे विद्युत प्रवाह जमिनीवर सुरक्षितपणे वाहतो, ज्यामुळे विद्युत शॉक टाळले जातात आणि व्यक्तींचे रक्षण सुनिश्चित होते.

फॉर्म क्र. INC – 26
[(कंपन्या (नोंदणी) नियम, 2014 च्या नियम 30 नुसार)]
राज्याबाहेरील दुसऱ्या राज्यात नोंदणीकृत कार्यालय बदलण्यासाठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाची जाहिरात
केंद्रीय सरकारपुढे
पश्चिम विभागीय संचालक
कंपनी कायदा, 2013 मधील कलम 13(4) व कंपन्या (नोंदणी) नियम, 2014 च्या नियम 30(5)(अ) संदर्भात
आणि
NEWEN SYSTEMS PRIVATE LIMITED या कंपनीच्या बाबतीत, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय सध्या ऑफिस क्र. 01, 5 वा मजला, A बिल्डिंग, सिटी व्हिस्टा, गट क्र. 53/2A/1, पुणे, महाराष्ट्र, भारत – 411014 येथे आहे.
.......................**याचिकाकर्ता**

सर्वसामान्य लोकांना यान्वये कळविण्यात येते की कंपनीने कंपनी कायदा, 2013 मधील कलम 13 अंतर्गत केंद्रीय सरकाराकडे अर्ज करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. या अनुषंगाने दिनांक 12 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या कंपनीच्या विशेष सर्वसाधारण सभेत विशेष ठराव मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय **"महाराष्ट्र राज्य" (पुणे) येथून "गुजरात राज्य" (वडोदरा)** येथे हलविण्यात येणार आहे.
ज्यांच्या हितावर या प्रस्तावित बदलाचा परिणाम होऊ शकतो, अशा कोणत्याही व्यक्तीने आपली **हरकत MCA-21 पोर्टलवर** (www.mca.gov.in) **इन्व्हेस्टर कंप्लेंट फॉर्म** भरून, किंवा प्रतिज्ञापत्रासह (स्वतःचा हितसंबंध व हरकतीचे कारण नमूद करून) नोंदणीकृत टपालाने/प्रत्यक्ष सुपूर्द करून पश्चिम विभागीय संचालक, एव्हरेस्ट, 5 वा मजला, 100 मरीन ड्राईव्ह, मुंबई – 400002, महाराष्ट्र, ईमेल: rd.west@mca.gov.in यांना द्यावी. तसेच त्याची प्रत कंपनीच्या नोंदणीकृत पत्त्यावर खालील पत्त्यावर 14 दिवसांच्या आत पाठवावी:
ऑफिस क्र. 01, 5 वा मजला, A बिल्डिंग, सिटी व्हिस्टा, गट क्र. 53/2A/1, पुणे, महाराष्ट्र, भारत – 411014

अर्जदाराच्या वतीने आणि
न्यूएन सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेड
अखिल कटारा
संचालक
डीआयएन : ०९७५४७५०

ठिकाण: पुणे
दिनांक: २२.०९.२०२५

उल्हासनगर महानगरपालिकेत 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात स्वच्छोत्सव रॅलीचे आयोजन

उल्हासनगर, दि. २३ (वार्ताहर) : स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय (MoHUA), भारत सरकार यांच्या निर्देशानुसार दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान उल्हासनगर महानगरपालिकेद्वारे "स्वच्छता ही सेवा" पंधरवडा आयोजित करण्यात आला असून, यावर्षी "स्वच्छोत्सव" हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मा. प्रशासक तथा आयुक्त मनीषा अव्हाळे (भा.प्र.से.) यांच्या आदेशानुसार, तसेच अतिरिक्त आयुक्त डॉ. किशोर गवस व उपआयुक्त श्रीम. विशाखा मोटघरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता स्वच्छता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

ही रॅली उल्हासनगर महानगरपालिका, सिंधू एज्युकेशन सोसायटी, अखिल भारतीय स्थानिक स्वराज संस्था व ओरियन कन्स्ट्रक्शन्स यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली. रॅलीमध्ये सिंधू एज्युकेशन सोसायटी हायस्कूल उल्हासनगर-१, सिंधू एज्युकेशन सोसायटी हायस्कूल खेमानी, तसेच मीयामी गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे सुमारे ५०० विद्यार्थी सहभागी झाले. प्रभाग समिती ०१ व ०२ मधील क्षेत्रात विद्यार्थ्यांनी नागरिकांना स्वच्छतेचे संदेश दिले. शहरातील नेहरू चौक येथे कचरा वर्गीकरणाचे महत्त्व, तसेच *"हरित शहर – स्वच्छ शहर"* या विषयांवर पथनाट्य सादर करून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वतःहून सुंदर घोषवाक्ये तयार करून हातात धरली आणि नागरिक व व्यापाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. या रॅलीसाठी सहायक आयुक्त श्रीम. मयुरी कदम, सहायक सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनीष हिवरे, मुख्य बाजार निरीक्षक श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री. एकनाथ पवार, सर्व स्वच्छता निरीक्षक तसेच विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांना श्री. विनोद केणे यांनी ओला व सुका कचरा वर्गीकरणाचे महत्त्व समजावून सांगितले, एकल वापर प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन केले तसेच आपल्या सण-उत्सवांना 'स्वच्छोत्सव' स्वरूपात साजरा करण्याचे मार्गदर्शन केले.

जेजुरीच्या खंडोबास भाविकाकडून १६ लाख रुपयांचा चांदीचा त्रिशूल अर्पण

जेजुरी , दि. २३ (वार्ताहर) : महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या श्रीक्षेत्र जेजुरी येथील खंडोबा देवास एका भाविकाने १६ लाख रुपये किमतीचा ११ किलो वजनाचा चांदीचा त्रिशूल आज अर्पण केला. पुणे येथील रांका ज्वेलर्स यांच्याकडे हा त्रिशूल त्यांनी खास बनवून घेतला आहे.

श्री खंडोबा देवसंस्थानचे मुख्य विश्वस्त मंगेश घोणे यांनी हा त्रिशूल स्वीकारला. थेऊर येथील खंडोबाभक्त सुजित तात्यासाहेब काळे यांनी नवरात्र उत्सवानिमित्त श्री खंडोबा देवास शुद्ध चांदीचा अकरा किलो वजनाचा त्रिशूल अर्पण केला. श्री खंडोबा गडावर त्यांनी अभिषेक पूजा केल्यानंतर त्रिशूल देवाच्या चरणी अर्पण करण्यात आला. हा त्रिशूल पाच फूट उंचीचा असून, श्री मार्तंडभैरवाजवळ ठेवला जाणार असल्याची माहिती मंगेश घोणे यांनी दिली.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, मी, **श्री सुरेश रामू कांबळे,** राहणार **फायर ब्रिगेड, रूम नं 91, 3/2 लोअर डेपो पाडा, गल्ली नं.3, पार्क साईट, विक्रोळी पुर्व, मुंबई 400079** यांच्या संदर्भात **माझी आई श्रीमती बाळाबाई रामू कांबळे** यांचे **निधन दिनांक 16.08.2022 रोजी कुर्ला, मुंबई येथे झाले असून मी त्यांचा वारस आहे.**
मी या प्रकाशनाद्वारे सर्व जनतेस आवाहन करीत आहेत की जर कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रकारे मृत्यू नोंद घेणेबाबत कोणाची हरकत असल्यास नमुद केलेल्या पत्त्यावर या नोटीशीच्या प्रकाशन दिनांका पासून 15 दिवसांच्या आत सादर करावेत, अन्यथा अशा व्यक्तीचे दावे, जर असतील तर, माफ केले गेले आणि किंवा त्यागले गेले असे समजले जाईल आणि ते माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत

श्री सुरेश रामू कांबळे,
फायर ब्रिगेड, रूम नं 91,
3/2 लोअर डेपो पाडा, गल्ली नं.3,
पार्क साईट,विक्रोळी पुर्व, मुंबई 400079

महेश हरिश्चंद्रे परि. उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी वेल्हा उपविभाग वेल्हा यांचे कार्यालय

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. 11/08/2023 रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा 2023 मध्ये कलम 11(2) व 3 नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून 1 वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद कारणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबंधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार संभाजी किसनराव कडू रा. कुरण बु ता. वेल्हा जि. पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म- मृत्यु नोंदणी कायदा 2023 मधील कलम 13(3) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांची आई के. बनुबाई किसनराव कडू यांचा मृत्यु मौजे. कुरण बु ता. वेल्हा जि. पुणे येथे दि.30/11/2022 रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म-मृत्यू नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून 15 दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा 2023 मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि. 24-09-2025 रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/मृत्यू/एस. आर/1259/12024
दिनांक :-24-09-2025
ठिकाण :- भोर

(महेश हरिश्चंद्रे)
परि. उपजिल्हाधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी तथा
दंडाधिकारी वेल्हा उपविभाग वेल्हा

फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.
युनिट क्रमांक : ११०१, ११ वा मजला, सिग्नस, प्लॉट क्रमांक ७१ए, पवई, पासपोली, मुंबई – ४०० ०८७
ताबा सूचना

ज्याअर्थी,
फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचे अधिकृत अधिकारी म्हणून, त्यांनी सिक्युरिटीजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ ऑफ २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून २२/१०/२०२४ रोजी एक मागणी सूचना जारी केली आहे ज्यामध्ये कर्जदार, गहाणवटदार, सह–कर्जदार आणि हमीदार यांना त्यांच्या मालकाद्वारे :- **(१) वंदना हेअर ड्रेसर्स (कर्जदार) त्यांचे प्रोप्रायटर, (२) रामकृष्ण काशिराम पवार (सह–कर्जदार); (३) उर्मिला काशिराम पवार (सह–कर्जदार); (४) आर्य रामकृष्ण पवार (सह–कर्जदार),** यांनी सदर सूचनेत नमूद केलेली रक्कम **रु. ३१,३१,४६४.७७/– (रुपये एकतीस लाख एकतीस हजार चारशे चौसष्ट आणि सत्याहत्तर पैसे फक्त) मधील निर्देशित रक्कमेचे प्रदान दि. २१.१०.२०२४ रोजी कर्ज खाते क्रमांक एफईडीएमयूएमएलएपी०५२९५३८** मधील करारानुसार व्याजासह सर्व खर्च शुल्क आणि आनुषंगिक खर्च इत्यादींसह, सदर मागणी सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत प्रदान करावे.
वरील निर्देशित कर्जदार, गहाणवटदार, सह–कर्जदार आणि जामीनदारांनी विशिष्ट कालावधीत वरील रक्कम परत करण्यास अपयशी ठरल्यामुळे, कर्जदार, गहाणवटदार, सह–कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, खाली स्वाक्षरी केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याने **२० सप्टेंबर २०२५** रोजी, सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.
येथे विशेषतः वर उल्लेख केलेले कर्जदार, गहाणवटदार, सह–कर्जदार आणि जामीनदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला येथे इशारा देण्यात येत आहे की त्यांनी खालील मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि खालील मालमत्तेशी कोणतेही व्यवहार केल्यास फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडकडून **२१/१०/२०२४ रोजी कर्ज खाते क्रमांक एफईडीएमयूएमएलएपी०५२९५३८ मध्ये रु. ३१,३१,४६४.७७/– (रुपये एकतीस लाख एकतीस हजार चारशे चौसष्ट व सत्याहत्तर पैसे फक्त)** शुल्क आकारले जाईल आणि करारानुसार दराने त्यावरील पुढील व्याजासह सर्व खर्च शुल्क आणि आनुषंगिक खर्च इत्यादी आकारले जातील.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) कडे आमंत्रित केले आहे, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात असेल.

अनुसूची १
गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन
सदगुरु अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, तळमजल्यावर, मोजमापित १६० चौरस फूट बांधलेल्या जागेवर, दुकान क्रमांक ०३, रघुनाथनगर, मोहनजी सुंदरजी रोड क्रमांक ९, वागळे इस्टेट, गाव – पंचपाखाडी, तालूका आणि जिल्हा ठाणे – ४०० ६०४ येथील सर्व्हे क्रमांक ९१ आणि ९२, हिस्सा क्रमांक १, सीटीएस क्रमांक १४/१ या मोजमापित २२०० चौरस फूट जागेवर बांधकामित आहे.

ठिकाण :– ठाणे
दि. २०.०९.२०२५

सही/– (अधिकृत अधिकारी)
फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.

This advertisement is for information purposes only and does not constitute an offer or an invitation or a recommendation to purchase, to hold or sell securities. This is not an announcement for the offer document. All capitalized terms used herein and not defined herein shall have the meaning assigned to them in the Letter of offer dated August 29, 2025 the "Letter of Offer" or ("LOF") filed with the BSE Limited ("BSE") and the Securities and Exchange Board of India ("SEBI").

DEEP DIAMOND INDIA LIMITED

(CIN- L24100MH1994PLC082609)

Our Company was originally incorporated as ''Deep Diamond India Limited'' a limited company vide a certificate of incorporation dated November 02, 1994, issued by the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra, under the provisions of the Companies Act, 1956. For further details please refer to the section titled "General Information" beginning on page 49 of the Letter of offer.

Registered Office: 309, 3rd Floor, V Star Plaza Plot No. 16 Chandavarkar Road, Opp. Saraswat Bank Borivali West, Opposite Raj Mahal Hotel, Borivali West, Mumbai, Maharashtra, India, 400092
Corporate office: 506-509 Fifth Floor, Apeksha, Plot no. 256, Main Road, Hiran Magri, Sector 11, Udaipur, Rajasthan -313001. **Tel:** 0294-3569097;
Email id: info.deepdiamondltd@gmail.com; **Website:** www.deepdiamondltd.in
Contact Person: Mr. Rakesh Vishnoi, Company Secretary & Compliance Officer

PROMOTERS OF THE COMPANY: This is to inform you that out of total 15 Promoters, 10 Promoters on 18th February, 2023 and the remaining 5 promoters on 16th August, 2023 pursuant to Regulation 31A of SEBI (LODR) Regulations, 2015, applied to BSE Limited, seeking to reclassify the following "Outgoing Promoters" from Promoters to Public category. The application is still under process and pending for approval.

THE ISSUE

ISSUE OF UPTO 9,61,00,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF RE. 1.00 EACH ("EQUITY SHARES") OF DEEP DIAMOND INDIA LIMITED ("DDIL" OR THE "COMPANY" OR THE "ISSUER") FOR CASH AT A PRICE OF RS. 4.16 PER EQUITY SHARE (INCLUDING PREMIUM OF RS. 3.16 PER EQUITY SHARE) ("ISSUE PRICE") FOR AN AGGREGATE AMOUNT NOT EXCEEDING RS. 3,997.76 LAKHS@ TO THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS ON RIGHTS BASIS IN THE RATIO OF 2 (TWO) EQUITY SHARES FOR EVERY 1 (ONE) EQUITY SHARE HELD BY THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS ON THE RECORD DATE, I.E. AUGUST 29, 2025 (THE "ISSUE"). THE ISSUE PRICE IS 4.16 TIMES OF FACE VALUE OF THE EQUITY SHARES. FOR FURTHER DETAILS, PLEASE SEE THE CHAPTER TITLED "TERMS OF THE ISSUE" ON PAGE 128 OF THE LETTER OF OFFER.
@assuming full subscription.

ATTENTION INVESTORS

NOTICE TO THE READER ("NOTICE") – CORRIGENDUM CUM ADDENDUM TO LETTER OF OFFER DATED AUGUST 29, 2025 AND CORRIGENDUM CUM ADDENDUM DATED SEPTEMBER 05, 2025 AND SEPTEMBER 11, 2025 RESPECTIVELY.

This notice should be read in conjunction with the LOF dated August 29, 2025 and Corrigendum cum addendum dated September 05, 2025 and September 11, 2025 respectively filed by the Company with the Stock Exchange and SEBI and the ALOF and CAF that have been sent to the Eligible Equity Shareholders of the Company. The Eligible Equity Shareholders are requested to please note the following:

NOTICE TO THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS OF THE COMPANY

RIGHTS ISSUE PERIOD EXTENDED	ISSUE CLOSING DATE (OLD)	ISSUE CLOSING DATE (NEW)
	WEDNESDAY, SEPTEMBER 24, 2025	TUESDAY, SEPTEMBER 30, 2025

This is to inform all eligible shareholders of the Company that the Rights Issue, which opened on **Tuesday, September 9, 2025**, and was originally scheduled to close on **Friday, September 19, 2025**, which was earlier extended to **Wednesday, September 24, 2025 has now been further extended to Tuesday, September 30, 2025**. The extension was approved by the Rights Issue Committee at its meeting held on September 23, 2025, to provide shareholders with additional time and opportunity to exercise their rights under the Rights Issue.
Accordingly, the last date of submission of the duly filled in CAF (along with the amount payable on application) is Tuesday, September 30, 2025. Equity Shareholders of the Company who are entitled to apply for the Rights Issue as mentioned above are requested to take note of the Issue Closure Date as Tuesday, September 30, 2025.

REVISED ISSUE SCHEDULE

Event Indicative	Indicative Date
Last date for credit of Rights entitlements	September 08, 2025
Issue Opening Date	September 09, 2025
Last Date on Market Renunciation of Rights Entitlements	September 18, 2025
Issue Closing Date	September 30, 2025
Finalization Of Basis of Allotment (On or About)	October 06, 2025
Date Of Allotment (On or About)	October 06, 2025
Date of Credit (On or About)	October 09, 2025
Date of Listing / Trading (On or About)	October 13, 2025

This Corrigendum cum addendum shall be available on the respective websites of the Stock Exchange at www.bseindia.com and the website of the Company at www.deepdiamondltd.in
Accordingly, there is no change in the LOF, CAF and ALOF dated August 29, 2025 and corrigendum cum addendum dated September 05, 2025 and September 11, 2025 respectively except for modification in the Issue Closing date. Change in Issue closing date resultant change in indicative time table of post issue activities on account of extension of issue closing date.
INVESTORS MAY PLEASE NOTE THE LETTER OF OFFER, ABRIDGED LETTER OF OFFER, COMMON APPLICATION FORM AND CORRIGENDUM CUM ADDENDUM DATED SEPTEMBER 05, 2025 AND SEPTEMBER 11, 2025 RESPECTIVELY SHALL BE READ IN CONJUCTION WITH THIS CORRIGENDUM CUM ADDENDUM.

For Deep Diamond India Limited
On Behalf of the Board of Directors
Sd/-
Narayan Singh Rathore
Managing Director
DIN: 10900646

Date: September 23, 2025
Place: Mumbai

Disclaimer: Our Company is proposing, subject to receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to issue Equity Shares on a rights basis and has filed a Letter of Offer dated August 29, 2025 with the Securities and Exchange Board of India and BSE. The Letter of Offer is available on the website of SEBI at www.sebi.gov.in, website of Stock Exchange where the Equity Shares are listed i.e., BSE at www.bseindia.com. Investors should note that investment in equity shares involves a high degree of risk and are requested to refer to the Letter of Offer including the section "Risk Factors" beginning on page 24 of the Letter of Offer. This announcement has been prepared for publication in India and may not be released in the United States. This announcement does not constitute an offer of Rights Equity Shares for sale in any jurisdiction, including the United States, and any Rights Equity Shares described in this announcement may not be offered or sold in the United States absent registration under the US Securities Act of 1933, as amended, or an exemption from registration. There will be no public offering of Rights Equity Shares in the United States.

यू ग्रो कॅपिटल लिमिटेड

४ था मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस रोड, कुर्ला, मुंबई ४०० ०७०

मागणी सूचना

सीक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (अॅक्ट) व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ (नियम) तरतूद अंतर्गत.
अधोहस्ताक्षरित म्हणून **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड** यांचे प्राधिकृत अधिकारी म्हणून अॅक्टच्या कलम १३(२) आणि नियम ३ नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिनियमाच्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी केल्या आहेत, ज्यामध्ये खालील कर्जदारांना सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत संबंधित सूचनांमध्ये नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले आहे. अधोहस्ताक्षरितांना असा विश्वास आहे की कर्जदार मागणी सूचनांची सेवा टाळत आहेत, म्हणून नियमांनुसार मागणी सूचनांची सेवा चिकटवून आणि प्रकाशित करून केली जात आहे.
मागणी सूचनांची सामग्री येथे खाली दिली आहे :

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	मागणी सूचना दिनांक व रक्कम
१.	१) निमेश दियोरा अॅन्ड असोसिएट्स २) निमेश मनसुखलाल दियोरा ३) मुक्ती कुलीन भेडा लॅन – यूजीएमयूएमएसएस०००००१५५५	मागणी सूचना तारीख : ०२–सप्टेंबर–२०२५ सूचना रक्कम : ३० ऑगस्ट २०२५ रोजी रु. २,७१,३०,०६०/–

सुरक्षित मालमत्तेचे वर्णन :– मालमत्ता १ : मालमत्ता फ्लॅट क्रमांक १४०३, ७५.२५ चौरस मीटर म्हणजेच ८१० चौरस फूट कार्पेट एरिया रेरा म्हणून १४ व्या निवासी मजल्यावर, मुलुंड चंदनबाला को-ऑप. हा. सोसायटी लिमिटेडच्या ओम रेसिडेन्सी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या पहिल्या व्यासपीठावर एक कार पार्किंग क्रमांक १५ सह, मुरार रोड, गाव मुलुंड **(पश्चिम)**, तालुका कुर्ला, मुंबई– ४०० ०८० येथे स्थित एस क्रमांक १०००, सीटीएस क्रमांक ११३२ ए, प्लॉट क्रमांक ११६१ या जमिनीवर बांधलेली आहे. **(सीमा) उत्तरेकडे किंवा दिशेने** :– प्लॉट क्रमांक ११२७ द्वारे, **दक्षिणेकडे किंवा दिशेने –** ४० फूट रुंद रस्ता, **पूर्वेकडे किंवा दिशेने –** प्लॉट क्रमांक ११६२, **पश्चिमेकडे :** प्लॉट क्र. ११६.
मालमत्ता २ : मालमत्ता धारक कार्यालय क्र. ए–६०८ मोज. २४०.७५ चौ. फूट चटई क्षेत्रफळ, ६ वा मजला, बिल्डींग तक्षशीला कमर्शिअल सेंटर प्रीमायसेस को-ऑप. सो. लि. म्हणून ज्ञात, आरएचबी रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई ४०० ०८० येथील बांधकामित जमिन धारक सीटीएस क्र. १२३३, १२३३/१ ते १०, १२३५ (भाग) गाव मुलुंड, तालूका कुराल, जिल्हा मुंबई.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	मागणी सूचना दिनांक व रक्कम
२.	१) तिआरा डायमंड ज्वेलरी २) रवीन अमृतलाल सांघवी ३) जल्पा जितेंद्र सांघवी एलएएन – यूजीपीएनएलएसएस००००६७०५६	मागणी सूचना तारीख : ०२–सप्टेंबर–२०२५ सूचना रक्कम : ३०–ऑगस्ट–२०२५ रोजी रु. २,७३,९७,३७५/–

सुरक्षित मालमत्तेचे वर्णन :– फ्लॅट क्रमांक ३०५, तिसऱ्या मजल्यावर, विंग क्रमांक ई, प्रशासकीय क्षेत्र ७९४.७३ चौरस फूट, (कार्पेट क्षेत्र) + १ कार पार्किंग जागा क्रमांक ८७, ऑर्किड सबर्बिया–३ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारती क्रमांक ३ मध्ये आणि ऑर्किड सबर्बिया सीएचएसएल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमध्ये, सी.टी.एस. जमिनीवर बांधलेले सीटीएस क्रमांक १२८/ए/१२, ६२८, ६२९ ते ६३२, ६३४ ते ६४६, ६५१/सी, ६५१/डी, ६७६ ते ६८०, ६८२, ६८४ए आणि ६८४बी/१ (सीसी+आयओए नुसार), लिंक रोड, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम), गाव–कांदिवली, ता.–बोरिवली, जिल्हा–मुंबई उपनगर–४०००६७ येथे स्थित. **सीमा: उत्तरेकडे किंवा दिशेने :एनए, दक्षिणेकडे किंवा दिशेने : एनए, पूर्वेकडे किंवा दिशेने : एनए, पश्चिमेकडे किंवा दिशेने : एनए.**

कर्जदारांना याद्वारे मागणी सूचनांचे पालन करण्यास आणि त्यामध्ये आणि येथे नमूद केलेली मागणी रक्कम या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत लागू व्याज, विलंबाने पैसे भरण्याचा दंड, बाउन्स शुल्क, खर्च आणि खर्च इत्यादींसह देयक वसूल होईपर्यंत भरण्याची सूचना देण्यात येत आहे. कर्जदारांनी हे लक्षात ठेवावे की, यूग्रो कॅपिटल लिमिटेड एक सुरक्षित कर्जदार आहे आणि कर्जदाराने घेतलेली कर्ज सुविधा ही यूग्रो कॅपिटल लिमिटेडकडे कर्जदाराने गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेविरुद्ध एक सुरक्षित कर्ज आहे.
जर कर्जदाराने निर्धारित वेळेत त्यांचे दायित्व पूर्ण केले नाही तर, **यूग्रो कॅपिटल लिमिटेड** कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्याचे सर्व अधिकार वापरण्यास पात्र असेल, ज्यामध्ये विक्रीद्वारे किंवा कर्जदाराच्या कर्ज खात्यातील थकबाकी वसूल करण्यासाठी कायदा आणि त्याखालील नियमांनुसार उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही उपायांचा समावेश आहे परंतु इतकेच मर्यादित नाही. **यूग्रो कॅपिटल लिमिटेडला** विक्री किंवा हस्तांतरणाचा अधिकार लागू करण्यापूर्वी सुरक्षित **मालमत्तेला जोडण्याचा आणि/किंवा सील** करण्याचा अधिकार आहे. सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीनंतर, **यूग्रो कॅपिटल लिमिटेडला** कर्जदाराने **यूग्रो कॅपिटल लिमिटेडला** देय असलेल्या थकबाकी भरण्यासाठी जर सुरक्षित मालमत्तेचे मूल्य अपुरे असेल तर, उर्वरित थकबाकी वसूल करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर कार्यवाही सुरू करण्याचा अधिकार आहे. हा उपाय यूग्रो कॅपिटल लिमिटेडला इतर कोणत्याही कायद्याअंतर्गत उपलब्ध असलेल्या इतर सर्व उपायांपेक्षा अतिरिक्त आणि स्वतंत्र आहे.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३(८) कडे आकर्षित केले आहे, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात आणि कायद्याच्या कलम १३(१३) कडे देखील आकर्षित केले आहे, ज्याद्वारे कर्जदाराला सुरक्षित मालमत्तेची विल्हेवाट लावण्यास किंवा व्यवहार करण्यास किंवा विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे (सामान्य व्यवसायाव्यतिरिक्त) कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंधित/प्रतिबंधित केले आहे. वरील नियमांचे पालन न करणे हा कायद्याच्या कलम २९ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. मागणी सूचनेची प्रत खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडे उपलब्ध आहे आणि कर्जदार, जर त्यांना हवे असेल तर, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडून ते गोळा करू शकतात.

ठिकाण : मुंबई
तारीख : २४.०९.२०२५

सही/– (अधिकृत अधिकारी)
यूग्रो कॅपिटल लिमिटेडसाठी, authorised.officer@ugrocapital.com

आरआयआर पॉवर इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : १३९/१४१, सोलारिस १, बी विंग, १ ला मजला, साकी विहार रोड, पवई, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०७२.
फोन : ०२२–२८४७१९५६; फॅक्स : ०२२–२८४७१९५९;
ई–मेल : secretarial@ruttonsha.com; वेबसाइट : www.rirpowersemi.com;
सीआयएन : L31109MH1969PLC014322

५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, ई–मतदान आणि अहवाल तारखेची सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आरआयआर पॉवर इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडच्या सदस्यांची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शुक्रवार, २६ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमे (ओएव्हीएम) द्वारे आयोजित केली जाईल, जी कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या लागू तरतुदींनुसार, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकांसह वाचली जाईल आणि ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसायांचे व्यवहार करण्यासाठी सेबीने जारी केलेल्या परिपत्रकांचे पालन करेल.

आर्थिक वर्ष २०२४–२५ साठीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल सर्व सदस्यांना ईमेलद्वारे पाठवण्यात आला आहे ज्यांचे ईमेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) / रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट्स (आरटीए) म्हणजेच अँड्रॉइट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे नोंदणीकृत आहेत. कंपनीच्या वेबसाइट www. rirpowersemi.com, स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com आणि ई–व्होटिंग एजन्सी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) च्या वेबसाइट www.evotingindia.com वर देखील उपलब्ध आहेत. कंपनीने गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५ रोजी सर्व सदस्यांना ईमेल पाठवण्याचे काम पूर्ण केले आहे.

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४२ नुसार, कंपनीने २०२४–२५ या आर्थिक वर्षासाठी पूर्णपणे भरलेल्या प्रत्येकी रु. २/– दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरवर रु. ०.२०/– लाभांश मिळविण्यासाठी कंपनीच्या भागधारकांना हक्क निश्चित करण्यासाठी शनिवार, २० सप्टेंबर, २०२५ ही अहवाल तारीख म्हणून निश्चित केली आहे.

शिवाय, लागू नियमांसह वाचलेल्या कायद्याच्या कलम १०८ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ च्या तरतुदींनुसार, सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपूर्वी रिमोट ई–व्होटिंग सुविधा द्वारे कोणत्याही ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतो आणि सूचनेत नमूद केलेल्या व्यवसायांसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान ई–व्होटिंग सुविधा द्वारे मतदान करू शकतो आणि सदस्यांना खालील गोष्टी लक्षात घेण्याची विनंती आहे :

१) ज्या व्यक्तीचे नाव कट–ऑफ तारखेला म्हणजेच शनिवार, २० सप्टेंबर, २०२५ रोजी सदस्यांच्या नोंदणीमध्ये / लाभार्थी मालकामध्ये आहे, त्यांनाच रिमोट ई–व्होटिंगची सुविधा तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहून मतदान करण्याची सुविधा मिळू शकेल.

२) रिमोट ई–व्होटिंग कालावधी मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता (भाप्रवे) सुरू होईल आणि गुरुवार २५ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) संपेल. या कालावधीत कंपनीचे ज्यांचे शेअर्स भौतिक स्वरूपात किंवा डिमॅट स्वरूपात आहेत ते इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात. त्यानंतर मतदानासाठी द्वारे ई–व्होटिंग मॉड्यूल बंद केले जाईल आणि सदस्यांना त्या तारखेनंतर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

३) ज्या सदस्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवल्यानंतर त्यांचा ईमेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही किंवा ई–व्होटिंगच्या अंतिम तारखेपूर्वी म्हणजेच शनिवार, २० सप्टेंबर २०२५ पर्यंत कंपनीचे सदस्य बनलेले कोणतेही सदस्य, ते सूचना आणि वार्षिक अहवालाची प्रत मिळविण्यासाठी त्यांचा फोलिओ क्रमांक / डीपी–आयडी / क्लायंट आयडी उद्धृत करून आरटीए / कंपनीला info@adroitcorporate.com/ secretarial@ruttonsha.com वर ईमेल करू शकतात. अशा सदस्यांना सीडीएसएलकडून रिमोट ई–व्होटिंगसाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळविण्यासाठी सूचनेत दिलेल्या सूचनांचे पालन करण्याची विनंती केली जाते. तथापि, जर सदस्य आधीच रिमोट ई–व्होटिंगसाठी सीडीएसएलमध्ये नोंदणीकृत असेल, तर विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड वापरता येईल.

४) एजीएममध्ये ई–व्होटिंगद्वारे मतदानाची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाईल आणि एजीएममध्ये उपस्थित राहणारे सदस्य ज्यांनी रिमोट ई–व्होटिंगद्वारे मतदान केलेले नाही ते एजीएममध्ये मतदान करण्यास पात्र असतील. ज्या सदस्यांनी रिमोट ई–व्होटिंगद्वारे मतदान केले आहे ते देखील सभेला उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.

ई–मतदानाची सविस्तर प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये दिली आहे. ई–मतदान प्रणालीवरून एजीएम आणि ई–मतदानाला उपस्थित राहण्याबाबत तुमचे काही प्रश्न किंवा समस्या असल्यास, तुम्ही www.evotingindia.com वर उपलब्ध असलेल्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि ई–मतदान मॅन्युअलचा मदत विभाग पाहू शकता किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल लिहू शकता किंवा श्री. नितीन कुंदर (०२२–२३०५८७३८) किंवा श्री. मेहबूब लखानी (०२२–२३०५८५४३) किंवा श्री. राकेश दळवी (०२२–२३०५८५४२) यांच्याशी संपर्क साधू शकता. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित सर्व तक्रारी श्री. राकेश दळवी, व्यवस्थापक, (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड, एन एम जोशी मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई ४०००१३ यांना पाठवा किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल पाठवा किंवा १८०० २२ ५५ ३३ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करा किंवा ०२२–२३०५८५४२/४३ वर संपर्क साधा.

आरआयआर पॉवर इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड साठी
सही/–
भाविन पी रामभीया
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
तारीख : २३ सप्टेंबर २०२५